**जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय**
**(जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण)**

**वाचा:** १. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५
२. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७

क्र.२०२०/आ.व्य./कावि-९६ दिनाक:- १८.०३.२०२०

**आदेश :-**

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

आणि ज्याअर्थी, आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत करोना विषाणू संसर्ग बाधित रुग्ण आढळत आहे. तसेच आंतराष्ट्रीय स्तरावरुन व देशांतर्गत विमान प्रवासद्वारे प्रवासी भारतात व इतरत्र प्रवास करीत आहे. त्यामुळे करोना विषाणूचे संशयित रुग्ण राज्यातील विविध ठिकाणी आढळून आल्याचे निदर्शनास आले आहे. परदेश दौ-यावरुन आलेल्या नागरिकांसाठी विलगीकरण कक्ष स्थापन करणे व त्यामध्ये १४ दिवसांसाठी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये खालील मार्गदशक सुचनांचे पालन करणे अनिवार्य करण्यात येत आहे.

**घरात विलगीकरण कक्षाबाबत मार्गदशक सूचना**

घरात विलगीकरण केलेल्या व्यक्तीने हवेशीर आणि वेगळी खोली ज्याला संडास बाथरुम जोडलेले आहे अशा खोलीमध्ये रहावे. जवळचे नातेवाईक जर त्या खोलीमध्ये राहणार असतील तर, त्यांनी रुग्णापासून कमीत कमी एक मिटर अंतरावर रहावे.

- परदेश दौ-यावर आलेल्या नागरिकांनी स्वतःहून शासकीय आरोग्य यंत्रणेस संपर्क साधून माहिती कळविणे बंधनकारक आहे.
- परदेश दौ-यावरुन आल्यानंतर १४ दिवस १०४ क्रमांकावर स्वतःची आरोग्य विषयक माहिती कळविणे बंधनकारक राहिल.
- त्यामध्ये करोना सदृश्य आजाराची प्राथमिक लक्षणे आढळल्यास स्वतःहून नजीकच्या शासकीय रुग्णालयामध्ये तपासणी करावी. व वैद्यकीय सल्यानुसार भरती व्हावे.
- अशा व्यक्तीने घरातील वृध्द, गर्भवती स्त्री, लहान मुले व प्रतिकार शक्ती कमी असलेल्या व्यक्तींच्या संपर्कात येऊ नये.
- अशा व्यक्तीने घरातील त्यांचा वावर सिमीत ठेवावा.

- अशा व्यक्तीने कोणत्याही परिस्थितीत सामाजिक किंवा धार्मीक कार्यक्रम ठिकाणी जाणे कटाक्षाने टाळावे.
- अशा व्यक्तींनी त्यांचे पुर्वनियोजित महत्वाचे कामकाजाबाबत वेळीच संबंधित प्राधिकारी यांना कळवून कामकाजाच्या ठिकाणी गैरहजर असल्याची पूर्व परवानगी घ्यावी.
- अशा व्यक्तीने अल्कोहलयुक्त हॅण्ड सॅनीटायझर किंवा साबण आणि पाण्याने वारंवार व्यवस्थित हात धुवावेत.
- अशा व्यक्तीने वापरलेले ताट, वापरलेले पाण्याचे ग्लास, कप, जेवणाची भांडी, टॉवेल, पांघरुण, गादी आणि इतर दैनंदिन वापरातील घरगुती वस्तु घरातील इतर व्यक्तींना वापरण्यास देऊ नये.
- अशा व्यक्तींनी पूर्ण वेळ सर्जीकल मास्कचा वापर करावा. मास्क दर ६ ते ८ तासांनी बदलावा आणि वापरलेल्या मास्कची योग्य प्रकारे विल्हेवाट लावावी, डिस्पोजेबल मास्क पुन्हा वापरु नयेत.
- अशा व्यक्तींनी/ त्यांची सुश्रुषा करणा-या व्यक्तींने / निकट सहवासीतांनी घरातील सुश्रुषे दरम्यान वापरलेले मास्क ५ टक्के ब्लिच सोल्यूशन किंवा १ टक्के सोडीयम हायपोक्लोराईट द्रावणामध्ये निर्जंतुक करुन त्याची जाळुन विल्हेवाट लावण्यात यावी.
- वापरलेला मास्क हा जंतुसंसर्ग युक्त समजावा.

**घरी विलगीकरण केलेल्या करोनाग्रस्त रुग्णाच्या नातेवाईकांसाठी सुचना**

- एकाच नातेवाईकाने अशा व्यक्तीची सुश्रुषा करावी.
- अशा व्यक्तीच्या शरीराशी थेट संपर्क येणे टाळावे. आणि त्यांचे वापरलेले कपडे झटकू नये.
- घरातील विलगीकरण कक्षाची स्वच्छता करताना किंवा अशा व्यक्तींचे वापरलेले कपडे हाताळताना डिस्पोजेबल ग्लोव्हजचा वापर करावा.
- डिस्पोजेबल ग्लोव्हज काढल्यानंतर हात स्वच्छ धुवावेत.
- नातेवाईक आणि अभ्यागतांना अशा व्यक्तींना भेटू देऊ नये.
- घरातील विलगीकरण कक्षामध्ये ठेवलेल्या व्यक्तींना जर कोविड-१९ बाबत लक्षणे आढळून आली तर त्याच्या निकट संपर्कात आलेल्या सर्व व्यक्तींना १४ दिवस घरातील विलगीकरण कक्षात ठेवावे. व पुढील १४ दिवस किंवा अशा व्यक्तीचा प्रयोगशाळा रिपोर्ट निगेटिव्ह येईपर्यंत त्याचा पाठपुरावा करावा.

**घराच्या स्तरावर विलगीकरण कक्षाची स्वच्छता**

- घरात केलेल्या विलगीकरण कक्षातील असलेल्या व्यक्तीच्या खोलीमधील बारंबार हाताळल्या जाणा-या वस्तुंचे (फर्निचर, बेड फ्रेम, टेबल) १ टक्के सोडीयम हायपोक्लोराईट द्रावणाने निर्जंतुकीकरण करावे.

- शौचालयाची स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण घरगुती ब्लिच किंवा घरगुती फिनायलने करावे.
- अशा व्यक्तींच्या संपर्कात आलेली कपडे, अंथरुण पांघरुण हे घरातील डिटर्जंट वापरुन वेगळे स्वच्छ धुवून वाळवावे.

उपरोक्त मार्गदशक सुचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे अन्यथा नियमानुसार कारवाई करुन संस्थात्मक विलगीकरण कक्षात स्थलांतरीत करण्यात येईल, याची गांभीर्यपूर्वक नोंद घ्यावी.

**( जी. श्रीकांत )**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा**
**आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण लातूर**

**I] प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादर:-**
१. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई - ०३२
२. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग मंत्रालय मुंबई - ०३२
२. मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद विभाग औरंगाबाद

**II] प्रत माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव**
१. पोलीस अधिक्षक, लातूर
२. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. लातूर
३. आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका, लातूर
४. सर्व उपविभागीय अधिकारी लातूर जिल्हा
५. सर्व तहसिलदार, लातूर जिल्हा
६. जिल्हा शल्य चिकित्सक, लातूर
७. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. लातूर
८. सर्व मुख्याधिकारी नगर पालिका / नगर पंचायत जिल्हा लातूर
९. जिल्हा माहिती अधिकारी लातूर यांना प्रसिध्दीसाठी देण्यात येते.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा**
**आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण लातूर**

Phone: (02382-220204, 224001) Fax: (02382-222330)
Website: www.latur.nic.in, E-mail: laturcollector@gmail.com, rdclatur@gmail.com , ddmolatur@gmail.com